महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ०४

शासन निर्णय क्र.संकीर्ण२०१९/प्र.क्र.(२४३/१९)/एस.डी.४,

दिनांक ८ ऑगस्ट,२०१९ नुसार

इयत्ता १० वी – मराठी

(प्रथम भाषा)

सुधारित मूल्यमापन आराखडा

मराठी- कुमारभारती-प्रथम भाषा

इयत्ता १०वी

घटकनिहाय गुणविभागणी

घटक	एकूण गुण
गद्य	१८
पद्य	१६
स्थूलवाचन	०६
भाषाभ्यास	१६
उपयोजित लेखन	२४
एकूण	८०

कृतिपत्रिका आराखडा

विभाग-१

गद्य – १८ गुण

अ) १पठित उतारा-	०७ गुण	१३० ते १५० शब्द
आ) १पठित उतारा-	०७ गुण	
इ) अपठित उतारा-	०४ गुण	८० ते १०० शब्द

अ आणि आ - ०७ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी

१) आकलन कृती - ०२ गुण

२) आकलन कृती - ०२ गुण

३) स्वमत - ०३ गुण

इ - ०४ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी

१) आकलन कृती - ०२ गुण

२) आकलन कृती - ०२ गुण

विभाग-०२

पद्य - एकूण १६ गुण

अ) पठित पद्य प्रत्येकी ०८ गुण

पाठयपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या पद्यांपैकी कोणतीही एक कविता कृतिपत्रिकेत देणे

८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी

१) आकलन कृती - ०२ गुण
२) आकलन कृती- ०२ गुण
३) कवितेतील दिलेल्या कोणत्याही दोन ओळींचा सरळ अर्थ ०२ गुण
४) काव्यसौंदर्य ०२ गुण

(दिलेल्या पद्यातील कोणत्याही २ ओळी देऊन त्यावर काव्यसौंदर्यासाठी योग्य कृती विचारणे)

आ) कवितेवरील आधारित कृती- ०८ गुण

'अ' साठी दिलेली कविता सोडून पाठ्यपुस्तकातील कोणत्याही दोन कवितांची फक्त नावे कृतिपत्रिकेत देणे व त्यावर आधारित कृती विचारणे

८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी

१. खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा. ०४ गुण
कवितेवर आधारित कृती

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री - ०१ गुण
२) प्रस्तुत कवितेचा विषय- ०१ गुण
३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचे अर्थ लिहा - ०२ गुण
(कवितेतील कोणतेही २ शब्द देणे व दोन्ही सोडवणे) प्रत्येकी ०१ गुण
४) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश लिहा ०२ गुण
५) प्रस्तुत कवितेची भाषिक वैशिष्ट्ये लिहा ०२ गुण
६) कवितेतून व्यक्त होणारा विचार लिहा ०२ गुण
७) कवितेतील दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ लिहा ०२ गुण
८) प्रस्तुत कविता तुम्हाला आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण लिहा ०२ गुण

०४ गुणांसाठी वरीलपैकी कोणत्याही कृती विचारणे

प्रत्येक कृती १ किंवा २ गुणांचीच असावी. ½ गुणासाठी कृती विचारली जावू नये.

२. काव्यपक्तींचे रसग्रहण ०४ गुण

'अ' व 'आ'साठी दिलेल्या कविता सोडून पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या पद्यांपैकी कोणत्याही एका कवितेतील रसग्रहणास अनुकूल अशा २ किंवा ४ ओळी कृतिपत्रिकेत देणे.
दिलेल्या काव्यपंक्तीचे रसग्रहण करा.

विभाग-०३

स्थूलवाचन - एकूण ०६ गुण

प्रत्येकी ०३/०३ गुणांच्या २ कृती

(स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित ३ कृती देणे व त्यांपैकी २ सोडवणे अपेक्षित)

विभाग -०४

भाषाभ्यास - एकूण १६ गुण

अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती - ०८ गुण

१) समास - द्विगू, कर्मधारय,द्वंद्व (वैकल्पिक द्वंद्व, समाहार द्वंद्व, इतरेतर द्वंद्व) ०२ गुण

२) शब्दसिद्धी - शब्द-प्रत्ययघटित, उपसर्गघटित, अभ्यस्त ०२ गुण

३) वाक्प्रचार - (०४ वाक्प्रचार कृती देणे व त्यांपैकी ०२ कृती सोडवणे अपेक्षित) ०४ गुण

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्या वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा
कृतिपत्रिकेत ४ वाक्प्रचार देणे व त्यांपैकी २ सोडविणे अपेक्षित
प्रत्येक वाक्प्रचाराचा अर्थ - ०१ गुण
प्रत्येक वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग - ०१ गुण

आ) भाषिक घटकांवर आधारित कृती - ०८ गुण

१) शब्दसंपत्ती- - ०४ गुण

अ) समानार्थी शब्द -
ब) विरुदधार्थी शब्द-
क) एकवचन/ अनेकवचन
वचन बदला/वचन ओळखा-
ड) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहिणे
तीन शब्दसमूह देणे त्यांपैकी दोन सोडवणे अपेक्षित
ई) शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करणे

यांपैकी कोणत्याही ४ घटकांवर प्रत्येकी १ गुणांच्या ४ कृती विचारणे

२)लेखननियमांनुसार लेखन- ०२ गुण

१)अचूक शब्द ओळखा - (कोणतेही ६ शब्द प्रत्येकी ४ पर्यायांसह देणे, पर्यायातील ०४ पैकी एकच शब्द (लेखनियामांनुसार) अचूक असावा. वरील ६शब्दांपैकी ४ शब्द सोडवणे अपेक्षित

किंवा

वाक्यातील लेखननियमांनुसार चुकीचे शब्द ओळखून दुरुस्त करा. प्रत्येक वाक्यात 2 शब्द लेखननियमांनुसार चुकीचे असलेली अशी चार वाक्ये देणे. त्यांपैकी 2 सोडवणे अपेक्षित

३)विरामचिन्हे - ०१ गुण

१. योग्य विरामचिन्हे वापरा.
२. विरामचिन्हे ओळखा
३. चुकीची विरामचिन्हे बदला.

यांपैकी ०१ गुणासाठी कोणतीही एक कृती विचारणे

४)पारिभाषिक शब्द - ०१ गुण

(गद्य, पद्य या दोन्ही विभागातील घटकांवर आधारित कोणतेही २ पारिभाषिक शब्द देणे व दोन्ही सोडवणे अपेक्षित) प्रत्येक शब्दासाठी ½ गुण

विभाग –०५

उपयोजित लेखन – २४ गुण

अ) पत्रलेखन ०६ गुण



किंवा

सारांश लेखन – (गद्य विभाग १–इ मधील अपठित गद्य उतारा)

मुद्दे विभाग. १ गद्य– इ मधील अपठित गद्य उतारा वाचा व त्याचा एकतृतियांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा

आ) १) जाहिरात लेखन –
२) बातमी लेखन –
३) कथा लेखन

प्रकारानुसार ६० ते ९० शब्द

१० गुण

कृतिपत्रिकेत तिन्ही घटकांवर अधारित

कृती देणे त्यांपैकी २ कृती सोडवणे अपेक्षित
(प्रत्येकी ०५ गुण)

ई) लेखनकौशल्य (१०० ते १२० शब्द) ०८ गुण

३) प्रसंग लेखन
१) आत्मकथन
२) वैचारिक

कृतिपत्रिकेत तिन्ही घटकांवर अधारित
कृती देणे त्यांपैकी १ सोडवणे अपेक्षित

मराठी- कुमारभारती-प्रथम भाषा

इयत्ता १०वी

विकल्पासह घटकनिहाय गुणविभागणी

घटक	एकूण गुण	विकल्प गुण	विकल्पासह गुण
गदय	१८	--	१८
पदय	१६	--	१६
स्थूलवाचन	०६	०३	०९
भाषाभ्यास	१६	०६	२२
उपयोजित लेखन	२४	२५	४९
एकूण	८०	३०	११४

काठिण्य पातळीनुसार घटकनिहाय गुणविभागणी

प्रथम भाषा – कुमारभारती

घटक		सोपे	मध्यम	अवघड	एकूण गुण
गद्य–अ					
अ–पठित गद्य		4	3	--	7
आ–पठित गदय	18	4	3	--	7
इ– अपठित गदय		--	4	--	4
पद्य					
अ–पठित पद्य		6	--	2	8
आ–कवितेवरील कृती	16	2	2	--	
रसग्रहण		--	--	4	8
स्थूलवाचन	06	--	6	--	6
भाषाभ्यास					
अ–व्याकरण घटकांवर आधारित		8	--	--	8
आ–भाषिक घटकांवर आधारित	16	8	--	--	8
उपयोजित लेखन					
अ–पत्र /सारांश		--	6	--	6
आ– जाहिरात लेखन					
बातमी लेखन		--			
कथा लेखन	24		--	10	10
इ– लेखनकौशल्य		--	8	--	8
	80	32(40%)	32(40%)	16(20%)	80

१. कृतिपत्रिकेतील कृतींची काठिण्यपातळी 40% सोपे , 40% मध्यम, 20% अवघड/कठीण अशी ठेवण्यात आलेली आहे. त्यानुसार कृतिपत्रिका काढणे आवश्यक आहे.

२. कृतिपत्रिका काढतांना ही काठिण्यपातळी घटकसापेक्ष बदलू शकते. तसा बदल कृतिपत्रिकेत करता येईल. परंतु कृतिपत्रिकेची काठिण्यपातळी मात्र सोपे 40% मध्यम 40% अवघड 20% ही टक्केवारी बदलणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

इयत्ता १० वी – मराठी (प्रथम भाषा)

कृतिपत्रिका

एकूण – ८० गुण

कृतिपत्रिकेसाठी सूचना :–

१. सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.
२. आकृत्या पेननेच काढाव्यात.
३. उपयोजित लेखनातील कृतींसाठी(सूचना निवेदन) आकृती काढण्याची आवश्यकता नाही. तसेच त्या कृती लिहून घेऊ नये.
४. विभाग –५ उपयोजित लेखन प्र.५(अ) किंवा सारांशलेखन या घटकांसाठी गद्य विभागातील प्र.१(इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.
५. स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

विभाग –१ : गद्य

१. अ. उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१. वैशिष्ट्ये लिहून तक्ता पूर्ण करा. – ०२ गुण



आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं आणि अगजी त्याची संपादक होती. तर सगळया बातम्या तिथं यायच्या. त्यांची शहानिशा व्हायची न् मग त्या गावभर जायच्या. कडुस पडायच्या आधी ही मैफल मोडायची. माणसांची वेळ झाली, की म्हातारीची ढाळज सुटायची. माणसं ढाळजंत बसायची. रात्री आठच्या दरम्यान ढाळजंचा दरवाजा लागला आणि एकदा आतनं आगळ टाकली, की वाडा शांत व्हायचा. ही आगळ दरवाजाला लावणं किंवा ती काढणं म्हणजे आमच्यासाठी दिव्य असायचं. मुळात ही सहा फुटांची लांब आणि पाऊण फूट रुंद अशी सागवानी आगळ एका भिंतीतल्या देवळीत आरपार जायची. ती आरपार घालवून दरवाजा उघडणं किंवा तिच्या तोंडाला असणाऱ्या पितळी वाघाच्या जबडयातील कडीला हात घालून ती बाहेर ओढणं व समोरच्या भिंतीतल्या देवळीत ढकलणं फार अवघड गणित होतं. ही आगळ म्हणजे दरवाजाचं, पर्यायाने वाडयाचं, भरभक्कम संरक्षक कवच होतं. दुपारीही एकदा आगळ टाकली की उन्हाचं, सुट्टीचं आम्हाला बाहेर पडायला संधी नसायची, तसाच रात्री त्या आगळीचा आधारही तितकाच वाटायचा.

भर उन्हात मग आजीला जास्त त्रास होऊ न देता तिथंच ढाळजंत, पडवीत, सोप्यात कुठंही आम्ही बैठे खेळ खेळायचो. चिंचोके, गजगं, खापराच्या भिंगऱ्या, जिबल्या, चुळूचुळू मुंगळा, भोवरा, गोटया असले खेळ असायचे.

२. वर्गीकरण करा. – ०२ गुण



३. स्वमत – – ०३ गुण

'लेखकाच्या घरची द्वाळज म्हणजे त्यांच्या गावचं वर्तमानपत्र' हे विधान पटवून द्या.

आ. उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१. उत्तरे लिहा. – ०२ गुण

अ. लेखकाच्या मते लेखनाचा जन्म होण्याची वेळ ---------

ब. लेखकाला न उलगडलेले कोडे ----------

आणि त्याच क्षणी नवे विचार, नव्या कल्पना माझ्या मनात कारंज्याच्या तुषारांप्रमाणे उडू लागतात!.... माझ्या लेखनातल्या कितीतरी गोष्टींचा जन्म अशा प्रकारे दाढी करण्याच्या वेळी झालेला आहे. या वेळीच माझ्या विचारांना का भरती यावी ते मला सांगता येणार नाही. ते एक मला अजून न उकललेलं गूढ आहे. कदाचित असं असेल की दाढी करण्याच्या वेळी माझ्याजवळ कोणी नसतं, असलेलं मला आवडतही नाही आणि या वेळी मिळणारा एकांत इतर सर्व वेळच्या एकांताहून निराळ्या स्वरूपाचा असतो. कदाचित हेही कारण असेल, की साबणाचा सुगंधी, शुभ्र, गुदगुल्या करणारा फेस तोंडावर फासताना व नंतर वस्तऱ्याच्या पात्यानं तो काढताना विचार करण्याचा माझा मुळीच हेतू नसतो आणि म्हणूनच नाना विचार माझ्या मनात येतात, कारण कल्पना ही देखील लक्ष्मीसारखी लहरी आहे. तिची आराधना करण्यासाठी तिच्यापुढे गुडघे टेकले, की ती रूसून दूर होते. उलट तिची पर्वा न करता पाठ फिरवली, की ती मागे लागते. इतर वेळी मी मुद्दाम विचार करण्याचा प्रयत्न करतो. मला काही सूचत नाही. दाढी करायच्या वेळेस मी विचारांच्या प्रयत्नात मुळीच नसतो. मनावर विलक्षण प्रसन्नता आलेली असते. कल्पना सुचतात... पण हे सारे माझे तर्क आहेत! खरं म्हणजे दाढी करण्याच्या वेळेस कल्पना उचंबळून का यावी हे माझं मलाच सांगता येत नाही. माझा एक अनुभव तुम्हाला सांगितला तो तुम्हाला पटला नाही तर सोडून द्या. मात्र पटावा म्हणून एवढंच सांगतो, की हा छोटासा लेखसुध्दा दाढी करता करता मला सुचला व मी लेखनिकाला सांगितला.

२. आकृतिबंध पूर्ण करा. – ०२ गुण

कल्पनेच्या लहरीपणाचे विशेष

३. प्रत्येकाची विचार करण्याची सवय आणि वेळ स्वतंत्र असते, याबाबत तुमचा विचार स्पष्ट करा. ०३ गुण

3. खालील पद्यपंक्तीचा सरळ अर्थ तुमच्या शब्दांत लिहा ०२ गुण

झरा लागेलच तिथे
खोद आणखी जरासे
उमेदीने जगण्याला
बळ लागते थोडेसे!

४. काव्यसौंदर्य

कवितेतून व्यक्त झालेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा ०२ गुण

२आ- १) खालील मुद्दयांच्या आधारे खालीलपैंकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.

कविता- १. वस्तू
२.उत्तमलक्षण

कृती-

१. प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री------ - ०१ गुण.
२. प्रस्तुत कवितेचा विषय---------- - ०१ गुण.
~~३. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश.-----~~ ~~- ०२ गुण~~
४. कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण ------ - ०२ गुण

२. खालील काव्यपंक्तीचे रसग्रहण करा. - ०४ गुण

भातुकलीतून प्रवेशताना वास्तवात
हातात हात असेल दोघांचाही
ज्यावर सहज विसावेल
बाहुली आणि चेंडू जोडीनं

विभाग - ३ : स्थूलवाचन

३. खालील पैंकी कोणत्याही दोन कृती सोडवा. - ०६ गुण

१. टीप लिहा.
बालनाटिका - एक अर्ज आहे बाप्पा.

२. 'व्युत्पत्ती कोश' या पाठाच्या आधारे व्युत्पत्ती कोशाचे कार्य तुमच्या शब्दांत लिहा.

३. सब इन्स्पेक्टर 'रेखा मिश्रा' यांच्या कार्याची माहिती वाचून तुमच्या मनात येणारे विचार 'वीरांगना' पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

विभाग – ४ : भाषाभ्यास

४. अ – व्याकरण घटकांवर आधारित कृती.

१. समास – ०२ गुण

योग्य जोडया लावा

समासाचे नाव	सामासिक शब्द
द्विदल	वैकल्पिक द्वंद्व
नीलकमल	द्विगू
	कर्मधारय

२. शब्दसिध्दी –

खालील तक्ता पूर्ण करा. – ०२ गुण

यथामती, खोदाई, नागरिक, बिनचूक

प्रत्ययघटित शब्द	उपसर्गघटित शब्द

३. वाक्प्रचार – ०४ गुण

खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.

i) डोळे विस्फारून बघणे
ii) तगादा लावणे
iii) तुळशीपत्र ठेवणे
iv) गहिवरुन येणे

४. आ – भाषिक घटकांवर आधारित कृती.

१. शब्दसंपत्ती –

१. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा. – ०२ गुण

कोणतेही २ शब्द सोडवा

i) अ. ज्याला कोणीही शत्रू नाही असा – ☐
ii) ब. महिन्यातून एकदा प्रकाशित होणारे – ☐
iii) क. ज्याचे आकलन होत नाही असे– ☐

२.खालील शब्दाचे कमीत कमी दोन समानार्थी शब्द लिहा – ०१ गुण

अ) रात्र ----

३. खालील शब्दातील अक्षरापासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा. – ०१ गुण

विनायक – १.---------- २.----------

३. लेखननियमांनुसार लेखन –

अ. अचूक शब्द ओळखा(कोणतेही दोन शब्द सोडवा) – ०२ गुण

i – हार्दीक/हारदिक/हार्दिक/हारदीक –

ii – अभिव्यक्ति/अभीव्यक्ती/अभीव्यक्ति/अभिव्यक्ती –

iii - वक्रृत्व/वक्तृत्व/वकतृत्व/वकृत्व

iv - अभीनंदन/अभिनंदन/अभीनदंन/ अभिनदंन

v - अंधकार/ अंधःकार/ अंधक्कार/अंधःक्कार

vi - कवियीत्री/कवियत्री/कवयित्री/कवईत्री

३. विरामचिन्हे – – ०१ गुण

खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.

ते खुशीत येऊन म्हणाले, सांगा काय केलंत

४. पारिभाषिक शब्द –

खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा. - ०१ गुण

i) Bio-data -

ii) Event -

विभाग – ५ : उपयोजित लेखन

५ अ. – खालील कृती सोडवा – – ०६ गुण

वाचा आणि प्रगल्भ व्हा विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी! अक्षरमैत्र वाचनालय, जुनेशहर, अकोला यांचे तर्फे दुर्मिळ पुस्तकांचे प्रदर्शन व विक्री	
स्थळ – अक्षरमैत्र वाचनालय सभागृह, जुनेशहर, अकोला.	दिनांक – दि. १५ ऑक्टोबर व दि. १६ ऑक्टोबर
वेळ – सकाळी १० वा.पासून ते सायं. ५ वा.पर्यंत	

सुजय/सुजया – विदयार्थी या नात्याने दुर्मीळ पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.	किंवा	सुजय / सुजया – शालेय प्रतिनिधी या नात्याने आयोजकांना शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

सारांश लेखन –

विभाग – १ : गद्य – इ(प्र.क्र. १ इ) मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

५ आ. – खालील पैकी कोणत्याही दोन कृती सोडवा – **– १० गुण**
(शब्दमर्यादा प्रकारानुसार ६० ते ९० शब्द)

१. जाहिरात लेखन
खालील शब्दांचा योग्य उपयोग करून आकर्षक जाहिरात तयार करा.

अभिनय कार्यशाळा	स्थळ – रत्नागिरी
आयोजक – अन्वय अॅकेडमी	प्रवेश विनामूल्य

२. बातमी लेखन –
खालील विषयावर बातमी तयार करा.
३ जानेवारी रोजी आदर्श विद्यालय, नगर या शाळेत 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' यांची जयंती साजरी करण्यात आली.

३. कथालेखन –
खालील मुद्दयांच्या आधारे कथा लिहा.

आंतरशालेय स्पर्धा – धावण्याच्या स्पर्धेत शाळेचा सहभाग – अथर्व शाळेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू – स्पर्धेचा दिवस – उत्तम सरावानंतर स्पर्धेत चुरस – प्रतिस्पर्धी तनयही उत्कृष्ट खेळाडू– चुरस खरी अथर्व व तनयमध्ये – प्रत्यक्ष स्पर्धा सुरू – अचानक तनयचा पाय मुरगळणे – अथर्वचे स्पर्धा सोडून तनयच्या मदतीला धावणे – अथर्व स्पर्धा हरूनही जिंकल्याचे समाधान – कौतुक.

विभाग - २ : पद्य

अ. दिलेल्या कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१. जोडया लावा. - ०२ गुण

कवितेतील संकल्पना	संकल्पनेचा अर्थ
i सारी खोटी नसतात नाणी	i मनातील विचार व्यक्त करावेत.
ii घट्ट मिटू नयेत ओठ	ii भ्रामक खोटया समजुती बाळगू नयेत.
	iii सगळे लोक फसवे नसतात.

२. एका वाक्यात उत्तरे लिहा ०२ गुण

i. 'खोदणे' याचा कवितेत व्यक्त होणारा अर्थ लिहा. ——

ii. 'उघडून ओजंळीत घ्यावी मनातली तळी' याचा- अर्थ सांगा ——

खोद आणखी थोडेसे ,
खाली असतेच पाणी,
धीर सोडू नको,
सारी खोटी नसतात नाणी.

घट्ट मिटू नये ओठ
गाणे असते गं मनी
आर्त जन्मांचे असते
रित्या गळणाऱ्या पानी

मूठ मिटून कशाला
म्हणायचे भरलेली
उघडून ओंजळीत
घ्यावी मनातील तळी

झरा लागेलच तिथे
खोद आणखी जरासे
उमेदीने जगण्याला
बळ लागते थोडेसे!

(16)

अपठित गद्य

१. इ. उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

अ)परिणाम लिहा. – ०१ गुण

वातावरणाचा माणसावर होणारा परिणाम

ब. वैशिष्टये लिहा. – ०१ गुण

कोटयवधी वर्षापूर्वी पृथ्वी सूर्यापासून अलग झाली. ती हळूहळू थंड होत गेली. तिच्यावर जी माती निर्माण झाली तीतूनच पुढे जीव जन्माला आले. सुरूवातीला ह्या जगात जन्माला आलेला जीव म्हणजे वनस्पतीच तर होता. त्यातून हळूहळू उत्क्रांती होत मानवाची निर्मिती झाली. जगात निर्माण झालेली ती पहिली वनस्पती हे जर एक टोक मानलं तर मनुष्य हे त्या साखळीचं दुसरं टोक आहे असं म्हणता येईल. म्हणूनच मलाही वाटतं, की माणूस हा झाडासारखा आहे. ऊन, सावली, थंडी, उष्णता ह्या सगळयांचा जसा झाडांवर परिणाम होतो, तसाच तो माणसांवरही होतो. आसपासच्या वातावरणामुळे माणसाचा स्वभाव बदलतो, त्याचा रक्तदाबसुध्दा बदलतो. म्हणूनच मनुष्य हा देखील एक झाडच आहे. त्यामुळेच झाडांशी आपलं फार पूर्वीपासूनचं कौटुंबीक नातं आहे असं मला वाटतं. पिंपळ हा पुरातन वृक्ष तर आमच्या पूर्वजांसारखाच आहे.

क. तुलना करा. – ०२ गुण

झाड	माणूस

(17)

-०८ गुण

इ - खालील लेखन प्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.

१. प्रसंगलेखन

नाशिक जिल्हा परिषद् शिक्षण विभाग, नाशिक आयोजित
आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा - पारितोषिक वितरण समारंभ.

दिनांक : २७ डिसेंबर वेळ - सकाळी ९.०० वाजता

प्रमुख पाहुणे - माननीय शिक्षणाधिकारी, नाशिक

वरील समारंभ प्रसंगी तुम्ही तुमच्या लहान भावाचे/बहिणीचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

३.दिलेल्या मुद्दयांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मवृत्त लिहा.



४. 'पाणी वाचवणे काळाची गरज' या विषयावर तुमचे विचार लिहा.

नमुना उत्तरपत्रिका – सर्वसाधारण सूचना
इ.१० वी मराठी प्रथम भाषा (कुमार भारती)

१. नमुना उत्तरपत्रिकेमध्ये दिलेली उत्तरे केवळ मार्गदर्शक आहेत. यापेक्षा वेगळी पण तर्कशुध्द (विषयाशी संबंधित) उत्तरे गुणांसाठी ग्राह्य धरावीत.

२. **स्वमतकृतीमध्ये** केवळ पाठयांशांवर आधारित उत्तराला पूर्ण गुण देऊ नयेत. तर उत्तरामध्ये विद्यार्थ्यांच्या विषयानुरूप वाचन, आकलन, निरीक्षण व विचारांवर आधारित उत्तराला प्राधान्य द्यावे. **मुक्तोतरी प्रश्नांच्या** उत्तरामध्ये विविधता असू शकते. (सकारात्मक वा नकारात्मक उत्तरही योग्य ते स्वीकारावे)

३. आकृत्या पेनने काढणे आवश्यक आहे. आकृती न काढल्यास किंवा पेनने न काढता पेन्सिलने काढल्यास त्याचा गुणदानावर परिणाम अपेक्षित नाही.

४. कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखन विभागातील कोणतीही कृती सोडवितांना प्रभावी भाषाशैलीला प्राधान्य द्यावे.

५. नमुना उत्तरपत्रिकेत प्रत्येक कृतीनुसार जी गुणदान योजना दिली आहे त्याचा नीट अभ्यास करावा व तारतम्याने गुणदान करावे.

६. आकलन आणि व्याकरण कृतींमध्ये व्याकरण लेखननियामांनुसार काटेकोरपणे तपासावे.

७. स्वमत कृतींमध्ये बोलीभाषा स्वीकारावी.

८. उपप्रश्न वा प्रत्येक कृतीस मिळालेले अपूर्णांकातील गुण पूर्णांकांत करू नये. संपूर्ण विभागातील एकूण गुण अपूर्णांकात असल्यास पूर्णांकात करावे. उदा. गद्य विभाग अ+आ+इ=मिळून मिळणारे गुण अपूर्णांकात असल्यास पूर्णांकात करावे.

स्थूल वाचन

कृतिपत्रिकेत पाठ्यांश दिलेला नाही. त्यामुळे संपूर्ण पाठाचे आकलन व पाठातील मध्यवर्ती विचार उत्तरात येणे अपेक्षित.

प्रत्येक कृतीसाठी

केवळ पाठावर आधारित उत्तरास	— ०१ गुण
आशयावर आधारित विचार, निरीक्षण, वाचन यांनुसार स्वतंत्र अभिव्यक्ती (स्वमत मांडणी) अपेक्षित	— ०२ गुण
वरील सर्व मुद्यांचा विचार करून एकत्रित गुणदान करणे अपेक्षित	एकूण ०३ गुण

व्याकरण

व्याकरणाच्या प्रत्येक घटकातील कृतीच्या स्वरूपावरून गुणांच्या विभागाणीनुसार गुणदान करावे.

उपयोजित लेखन – गुणदान योजना

उपयोजित लेखन विभागातील प्रत्येक कृतीचे खालील घटकनिहाय दिलेल्या निकषांनुसार गुणदान करावे.

पत्रलेखन – ६ गुण

इ–मेल प्रारूप (मायना, दिनांक, विषय)	— ०२ गुण
पत्राच्या विषयानुरूप मजकूर व मजकुरासाठी कृतीतील सर्व मुद्यांचा योग्य विचार	— ०३ गुण
खालचा मायना (पत्र पाठविणाऱ्याचा पत्ता)	— ०१ गुण
वरील सर्व मुद्यांचा विचार करून एकत्रित गुणदान करणे अपेक्षित	
	एकूण ०६ गुण

सारांश लेखन – ६ गुण

दिलेल्या परिच्छेदाचे १/३ एवढया शब्दांत सारांश लेखन	— ०२ गुण
परिच्छेदाचा संपूर्ण आशय सारांश लेखनात अपेक्षित	— ०२ गुण
स्वत:च्या भाषेत सारांश लेखनाची मांडणी	— ०२ गुण
वरील सर्व मुद्यांचा विचार करून एकत्रित गुणदान करणे अपेक्षित	
	एकूण ०६ गुण

20

लेखन कौशल्य

(निबंध)

(१) प्रसंग लेखन – संवेदनशील, भावपूर्ण लेखन

(२) आत्मकथन – प्रथमपुरूषी एकवचनी भाषा

(३) वैचारिक – विषयाचा चिकित्सक विचार

आकर्षक सुरूवात		– ०२ गुण
विषयानुरूप विस्तार, सुसूत्र मांडणी		– ०२ गुण
भाषाशैली, नावीन्यपूर्ण कल्पना		– ०२ गुण
सुयोग्य समारोप, शेवट		– ०२ गुण
कृतीतील सर्व मुद्दयांचा योग्य विचार अपेक्षित	एकूण	०८ गुण

किती लिहिले ; यापेक्षा कसे लिहिले ? काय विचार केला ? विषयाची मांडणी कशी केली ? या मुद्यांना गुणदानासाठी प्राधान्य द्यावे.

इयत्ता १० वी – मराठी (प्रथम भाषा)
नमुना उत्तरपत्रिका

एकूण – ८० गुण

विभाग – १ : गद्य

१.अ. उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१. वैशिष्टये लिहा. – ०२ गुण

आगळ

१. सहा फूट लांब
२. पाऊण फूट रुंद
३. सागवानी
४. देवळीत आरपार जाणारी
५. वाडयाच संरक्षक कवच

(कोणतीही चार उत्तरे स्वीकारावीत – (प्रत्येकी १/२ गुण)

२. वर्गीकरण करा. – ०२ गुण

बैठे खेळ	मैदानी खेळ
चिंचोके, गजगं	भोवरा, गोटया

३. स्वमत – – ०३ गुण

गुणदान योजनेतील निकषांप्रमाणे गुणदान करावे.

१.आ. उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१. उत्तरे लिहा. – ०२ गुण

अ – लेखकाच्यामते लेखनाचा जन्म होण्याची वेळ दाढी करण्याची.

ब – लेखकाला दाढी करतानाच विचारांना भरती का यावी ? न उलगडलेले कोडे आहे.

२. आकृतिबंध पूर्ण करा. – ०२ गुण

कल्पनेच्या लहरीपणाचे विशेष

१. लक्ष्मीसारखी लहरी
२. तिच्या समोर गुडघे टेकले तर रूसते.
३. तिच्याकडे पाठ फिरवली तर मागे लागते.
४. लेखकाला दाढी करताना सूचते.

कोणतेही २ उत्तरे स्वीकारावी प्रत्येकी १ गुण

३.स्वमत – ०३ गुण

गुणदान योजनेतील निकषांप्रमाणे गुणदान करावे.

१.इ. उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१. परिणाम लिहा. – ०१ गुण

१. स्वभाव बदलतो २. रक्तदाबसुध्दा बदलतो (प्रत्येकी १/२ गुण)

२.वैशिष्टये – – ०१ गुण

पिंपळ

१. पुरातन वृक्ष
२. माणसाच्या/आपल्या पूर्वजांसारखा

(प्रत्येकी १/२ गुण)

३. तुलना करा. – ०२ गुण

झाड	माणूस
१. जग निर्मितीतील पहिले टोक	१.जग निर्मितीतील शेवटचे टोक
२. वातावरणाचा परिणाम होतो	२.वातावरणाचा परिणाम होतो.
	३.झाडाशी कौटुंबिक नातं

(कोणतीही दोन उत्तरे स्वीकारावीत – (प्रत्येक मुद्दयाला १/२ गुण)

विभाग – २ : पद्य

२. अ – दिलेल्या कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१. जोडया लावा. – ०२ गुण

कवितेतील संकल्पना	संकल्पनेचा अर्थ
१ सारी खोटी नसतात नाणी	अ सगळे लोक फसवे नसतात.
२ घट्ट मिटू नका ओठ	ब मनातील विचार व्यक्त करावेत.

२.एका वाक्यात उत्तरे लिहा – ०२ गुण

- प्रयत्न करणे/ सकारात्मक विचार करणे/ आत्मपरीक्षण करणे. यांपैकी किंवा या अर्थाचे कोणतेही समर्पक उत्तर स्वीकारावे.
- मनातले विचार, भाव व्यक्त करावे. मनाचे सामर्थ्य वाढवावे- यांपैकी किंवा या अर्थाचे कोणतेही समर्पक उत्तर स्वीकारावे.

३.दिलेल्या काव्यपंक्तीचा सरळ अर्थ विद्यार्थ्यांनी स्वतःच्या शब्दांत व्यक्त करणे अपेक्षित आहे. कोणतेही योग्य उत्तर स्वीकारावे. उत्तरासाठी प्रस्तावना लिहीण्याची आवश्यकता नाही. ०२ गुण

४.काव्यसौंदर्य- ०२ गुण

गुणदान योजनेतील निकषांप्रमाणे गुणदान करणे अपेक्षित

२ आ १ -खालील मुद्दयांच्या आधारे कृती सोडवा.

वस्तू	उत्तम लक्षण	
१. कवी- द.भा.धामणस्कर	कवी संत रामदास	०१गुण
२. वस्तूंनाही भावना असतात हे समजून वस्तू वापराव्यात/ निर्जीव वस्तूंवरही प्रेम करावे. कोणतेही एक उत्तर चालेल.	आदर्श व्यक्तीची लक्षणे काय करावे, काय करु नये, याबाबत मार्गदर्शन. उत्तम आचरणाचे मार्गदर्शन कोणतेही एक उत्तर चालेल.	०१गुण

२.कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण विद्यार्थ्यांनी स्वविचाराने लिहणे व ते सकारण स्पष्ट करणे अपेक्षित आहे. ०२गुण
सकारात्मक वा नकारात्मक दोन्ही योग्य उत्तरे स्वीकारावीत.

३. रसग्रहण ०४ गुण
- गुणदान योजनेतील निकषांप्रमाणे गुणदान करावे.

विभाग - ३ :

स्थूलवाचन ०३ गुण

गुणदान योजनेतील निकषांप्रमाणे गुणदान करावे.

विभाग - ४ : भाषाभ्यास

४. अ - व्याकरण घटकांवर आधारित कृती.

१. १. समास - ०२ गुण

योग्य जोडया लावा

समासाचे नाव	सामासिक शब्द
द्विदल	दविगू समास
नीलकमल	कर्मधारय समास

प्रत्येक जोडीला ०४ गुण

२. शब्दसिध्दी -

खालील तक्ता पूर्ण करा. - ०२ गुण

प्रत्ययघटित शब्द	उपसर्गघटित शब्द
खोदाई	यथामती
नागरिक	बिनचूक

३. वाक्प्रचार - ०४ गुण

वाक्प्रचार	अर्थ
डोळे विस्फारून पाहणे	आश्चर्य वाटणे
तगादा लावणे	मागे लागणे/पिच्छा पुरवणे
तुळशीपत्र ठेवणे	त्याग करणे
गहिवरून येणे	हुंदका दाटणे/मन भरून येणे

वाक्प्रचारांचा समर्पक वाक्यात उपयोग अपेक्षित.
कोणतेही दोन वाक्प्रचार सोडवणे
प्रत्येक वाक्प्रचाराच्या अर्थाला १ गुण, वाक्प्रचाराच्या वाक्यात उपयोगाला १ गुण.

४. आ – भाषिक घटकांवर आधारित कृती.

१. शब्दसंपत्ती – समूहाबद्दल १ शब्द

अ. १. अजातशत्रू २. मासिक ३.अनाकलनीय २ गुण

प्रत्येक शब्दाला १ गुण.

ब. समानार्थी शब्द–

खालील शब्दाला समानार्थी शब्द (कमीत कमी २ शब्द)

रात्र–निशा/रजनी/यामिनी १ गुण

क. अर्थपूर्ण शब्द तयार करा. १ गुण

विनायक – विना, नायक, नाक, विक, नाविक, नायक

कोणतेही दोन २ शब्द स्वीकारावे प्रत्येकी १/२ गुण

२. लेखननियमांनुसार लेखन – १ गुण

अ. अचूक शब्द

कोणतेही ४ शब्द सोडवणे अपेक्षित

१. हार्दिक २. अभिव्यक्ती ३.वक्तृत्व ४.अभिनंदन ५.अंधःकार ६. कवयित्री –प्रत्येकी १/२ गुण

३. विरामचिन्हे

ते खुर्शीत येऊन म्हणाले, ''सांगा काय केलंत'' ? १ गुण

४. पारिभाषिक शब्द १ गुण

१. Bio-Data – स्वपरिचय/वैयक्तिक माहिती.

२. Event – घटना. प्रत्येक शब्दाला १/२ गुण

विभाग – ५ : उपयोजित लेखन २४ गुण

गुणदान योजनेतील निकषांप्रमाणे गुणदान करावे.